REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# श्री. ना. पेंडसे यांच्या प्रादेशिक कादंबरीतील व्यक्तिरेखा

प्रा. डॉ. भास्कर निफाडे
पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, जि.अहमदनगर.

## प्रास्ताविक :

श्री. ना. पेंडसे हे एक यशस्वी प्रादेशिक कादंबरीकार आहेत. त्यांनी १९४९ साली 'एल्गार' ही पहिली प्रादेशिक कादंबरी लिहून कादंबरी क्षेत्रात पदार्पण केले. १९९५ साली प्रकाशित झालेल्या 'एक होती आजी' या कादंबरीपर्यंत त्यांचा लेखन प्रवास अविरत सुरु असलेला दिसून येतो. त्यांच्या हद्दपार (१९५०), गारंबीचा बाप (१९५२), यशोदा (१९५७), रथचक्र (१९६२), तुंबाडाचे खोत (१९८७) आणि गारंबीची राधा (१९९३) या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. इंग्रजीत हार्डीने ज्याप्रमाणे वेसेक्सच्या पार्श्वभूमीवर कादंबऱ्या लिहून 'रीजनल नॉव्हेल' हा प्रकार रुढ केला, त्याप्रमाणे मराठी कादंबरीत कोकणच्या पार्श्वभूमीवर लागोपाठ कादंबऱ्या लिहून श्री. ना. पेंडसे यांनी 'प्रादेशिक कादंबरी' हा प्रकार रुढ केला. समृध्द केला.

## • प्रादेशिक कादंबरी :

प्रादेशिक कादंबरी हा कादंबरी वाङ्मयाचाच एक प्रकार असून आशयाधिष्ठित वेगळेपण सदर साहित्यकृतीत आढळते. राजकीय कादंबरीला ज्याप्रमाणे राजकीय पार्श्वभूमी, ऐतिहासिक कादंबरीला ऐतिहासिक पार्श्वभूमी आवश्यक असते, सामाजिक कादंबरीमध्ये सामाजिक आशय महत्त्वाचा असतो, त्याचप्रमाणे प्रादेशिक कादंबरीमध्ये 'प्रादेशिकते' ला प्राधान्य मिळालेले असते. प्रादेशिक कादंबरी असलेला 'प्रदेश' हा त्या कादंबरीचा एक अविभाज्य भाग असतो नव्हे, तोच त्या कादंबरीचा नायक असतो. त्या कादंबरीत आलेले घटक त्या 'प्रदेशा' ने नियत केलेले असतात. उदा. त्या प्रदेशाचे भौगोलिक, नैसर्गिक वातावरण, तेथील समाजजीवन, व्यक्तिचित्रण हे प्रदेशाधिष्ठित असते. समाजाचे निसर्गाधिष्ठित राहणीमान, दैनंदिन कामाची-जेवणाची पध्दती, तेथील बोलीभाषा, समाजबोलीतील वाक्प्रचार आणि म्हणी, सामाजिक रीतीरिवाज, रुढी-परंपरा यातून त्या प्रदेशाचे, त्याच्या प्रादेशिकतेचे वेगळेपण सहजतेने लक्षात येते.

## • प्रादेशिक कादंबरीचे वेगळेपण :

प्रादेशिक कादंबरीचे वेगळेपण हे त्यात आलेल्या प्रादेशिकतेत आढळून येते. तेथील भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीनुरुप जनजीवन असते. तेथील लोकसंस्कृती आणि लोकपरंपरेच्या माध्यमातून तेथील रुढींचे-रिवाजांचे, समज-गैरसमज, श्रध्दा-अंधश्रध्दा यांचे दर्शन घडते. प्रत्यक्ष नागर समाजापासून लांब असलेला हा प्रदेश आपले सांस्कृतिक वैभव टिकून असतो. शिक्षणापासून, सुधारित विचारसरणीपासून अलिप्त असल्याने तो समाज निसर्गाशी जवळीक साधणारा असा असतो. जगातील घडामोडींशी त्यांचा फारसा संबंध येत नाही. उदा. श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू' या कादंबरीतील प्रदेश लक्षात घेतला असता, तेथील लोकांचे 'विश्व' हे 'गारंबी' पुरतेच मर्यादित दिसते. तसेच 'हद्दपार' ही कादंबरी उदाहरणादाखल घेतली असता यातील 'विश्व' हे 'दुर्गेश्वर - बुरोंडी' पुरते मर्यादित आहे. या विवक्षित भूप्रदेशातून कोकणी जीवनशैलीची वैशिष्ट्ये रसिक वाचकांच्या निदर्शनास येतात.



## • प्रादेशिक कादंबरीतील व्यक्तिरेखा :

श्री. ना. पेंडसे यांच्या आजपर्यंत प्रकाशित झालेल्या प्रादेशिक कादंबऱ्या या सर्व कोकणच्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या आहेत. त्यांच्या ''कादंबऱ्यांमधून प्रदेश जीवनातून

पात्रे वर उसळून आलेली असतात.''[१] ही पात्रे अथवा व्यक्तिरेखा विविध वर्गांतील, वर्णांतील जातींतील असून वेगवेगळ्या स्वभावाची आहेत. काही व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व हे अष्टपैलू, तर काहींमध्ये एखादाच गुण प्रकर्षाने जाणवतो. उदा. 'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील 'नरसू खोत' ही बहुआयामी व्यक्तिरेखा; तर बजापा गणेश तुंबाडकर यात प्रमुख दोनच स्वभावगुण आढळतात. अशारितीने व्यक्तिरेखांचे बहुविध दर्शन घडते. श्री. ना. पेंडसे हे प्रदेश, भाषा, प्रदेशवैशिष्ट्ये आणि लोकजीवनाचे चित्रण गांभीर्याने करतात. ''त्यांच्या कादंबऱ्यांतून येणारा निसर्ग उपरा नसतो. तो कथानकाशी एकजीवन झालेला असतो.''[२] पेंडसे यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांतील व्यक्ती याही तद्वतच प्रादेशिकतेशी एकरुप झालेल्या दिसतात.

'श्री. ना. पेंडसे यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा' या अभ्यासपूर्ण मांडणीच्या दृष्टीने पुरुष व्यक्तिरेखा आणि स्त्री व्यक्तिरेखा असे वर्गीकरण केले असता सोयीचे होईल. 'एल्गार' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा रघू बेंद्रे ही असून त्याचे मित्र कादर यांच्यावरील 'मानवता' सदृश प्रेम लेखकाने दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. रघू बेंद्रे हा भटजींचा मुलगा-जातीने ब्राह्मण, प्रकृतीने आडदांड असा. शालेय शिक्षणापासूनच त्याची आणि कादरची मैत्री होते. कादर हा तेली आणि मुसलमान असतो. स्वभावाने अतिशय गरीब आणि अभ्यासात खूप हुशार अशी विरुध्द स्वभावाची दोन मित्रांची मैत्री मात्र अतूट असते. रघू बेंद्रेचे वडील अण्णा हे कर्मठ, बाह्य आचरणांना अवास्तव महत्त्व देणारे, तर कादरचे वडील मियाँ हे उदार आणि उदात्त विचारांचे, इतरांचे वर्चस्व, श्रेष्ठत्व मान्य करणारे, रघूला त्याच्या स्वतःच्या वडिलांचा स्वभाव आवडत नाही. वडिलांशी त्याचे वाद होतात. तेव्हा अब्दुल मियाँ -अब्बाजान त्याला समजावून सांगतात. सदर कादंबरीच्या उत्तरार्धात मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदू-मुसलमान अशी धार्मिक चळवळ सुरु होते. रघू आणि कादर दोघेही त्यांच्या स्वतःच्या धर्माचे नेतृत्व करतात. बेडर, उर्मट असलेला रघू मित्राच्या कौटुंबिक जीवनात सौजन्याने घालवलेले क्षण निकराच्या हल्याप्रसंगी विसरतो. ते प्रेमाचे, सौहर्दाचे संबंध मोडकळीस येतात की काय असे वाटू लागते. पण या दंगलीत कादर आजारी पडल्यानंतर त्याच्या अत्यवस्थ स्थितीत तो त्याची सेवा करतो. कादरची आई आणि पत्नी इकबालसमवेत रघूच्या घरी आश्रयासाठी आली असतो त्यांना घरात तर घेतोच, पण कादरचे-मित्राचे पेटलेले घर विझविण्यास पुढाकार घेतो.

रघूची स्वभाव प्रवृत्ती ही मित्राला तन-मन-धनाने मदत करण्याची असते. कादर सासरी राहायला गेल्यानंतर त्याचे वडील आजारी पडतात. त्यांची सुश्रृषा तो करतो. यासाठी त्या जात-धर्म-पंथ आडवे येत नाहीत. 'निष्पाप, निरपेक्ष प्रेम' ज्याला आपण म्हणतो अशा प्रेमाची ज्योत रघूच्या अंतःकरणात सतत तेवत असलेली आपल्या निदर्शनास येते.

कोकणातील 'साखरपेंडी' सारख्या लहानशा खेडयाची पार्श्वभूमी या कादंबरीच्या कथानकाला लाभलेली आहे. तेथील दुर्गामातेचा उत्सव (देवीची यात्रा) आणि पिराची जत्रा हे प्रसंग तेथील लोक दिवाळीसारखे साजरे करतात. तिथे फक्त तीनच आळ्या असतात. ब्राह्मणवाडा, कोळीवाडा आणि मुसलमानांची वस्ती या गावातील प्रत्येक व्यक्तीला इतर सर्व व्यक्तींची माहिती असते. त्यामुळे रघू बेंद्रेसारखा लबाड मुलगा मास्तरांशी खोटे बोलू शकत नाही. ते तात्काळ तपासून घेतले जाऊ शकते. शहरापासून हे लांब असल्याने शैक्षणिकदृष्ट्या आणि इतर दृष्टिने मागासलेले असते.

'हद्दपार' या कादंबरीत दुर्गेश्वर-बुरोंडी चा परिसर आलेला आहे; तर 'गारंबीचा बापू' या कादंबरीत गारंबीचा प्रदेश आलेला आहे. 'हद्दपार' या कादंबरीतील 'राजेमास्तर' आणि 'गारंबीचा बाप' मधील 'बापू' या दोन व्यक्तिरेखा बंडखोर प्रवृत्तीच्या, उदात्ततेच्या भूमिकेने झपाटलेल्या आहेत. राजेमास्तर हे कोरडेवंशीय राजेघराण्यातील; परंतु त्यांच्या घराण्याच्या पोकळ प्रतिष्ठेवर विश्वास नाही. आपल्या कुणा एका पूर्वजाने केलेल्या कर्तृत्त्वावर मिजास मारणे त्यांच्या स्वभावात नाही. स्वकर्तृत्वावर विश्वास असलेले मास्तर 'क्षत्रिय' धर्माला न शोभणारी 'नोकरी' ही शूद्र कृती समजल्या जाणाऱ्या समाजात वावरत असतात. कुणब्यांच्या मुलांना शाळेचे शैक्षणिक वळण लावतात. त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करतात. इतकेच नव्हे, सर्वांशी माणुसकीने आणि सत्याने वर्तन करण्याचे शिक्षण देतात. तत्त्वासाठी प्रसंगी ते आपल्या पैयक्तिक जीवनाचा विचार करीत नाहीत. जसे शेरणे वपुरण्याचा मान म्हांबऱ्यांचा असतो. सोन्याबापूंचे पूर्वज मात्र त्यांच्याकडून कर्जाच्या बदल्यात म्हांबऱ्यांचे शेत तर घेतातच पण 'शेरणे पुरण्याचा मान' ही आपल्याकडेच घेतात. परिणाम त्यांचे वैभव नाहीसे होते. म्हांबरीला राजेघराण्यातील कुटुंबाकडे गड्याचे काम स्वीकारावे लागते. राजेवाड्यावरही गरिबीचे मळभ येते तेव्हा ती इतरांकडे कामाला जाऊ लागते. गरज पडली असता राजेवाड्यावर कामाला येत असते. राजेमास्तरांना हा इतिहास ज्ञात असतो. प्रसंगी सोन्याबापूंनी दाखविलेल्या पैशांच्या आमिषाला ते बळी पडत नाहीत. सत्यान्वेषी भूमिका ते स्वीकारतात.

'हद्दपार' या कादंबरीत राजेमास्तरांप्रमाणे इतर व्यक्ती नाहीत. राजवैद्य नाना शिंदे आहेत. सावकारी बुध्दीने वागणारे, परिस्थितीने नाडलेल्यांना लुबाडणारे सोन्याबापू आखवे आहेत; निर्मल, दिगू शिंत्र्ये, लंबोदर जोशी यासारखे हुशार आणि नाव कमावलेले असे मास्तरांचे विद्यार्थी आहेत. स्त्री व्यक्तिरेखांमध्ये म्हांबरी आणि मास्तरांची पत्नी आई या आहेत. सर्व मुलांची 'आई' असलेली मास्तरांनी पत्नी मातृत्व पदरात पडतात तिच्या एकट्या बाळाची होते. विद्यार्थ्यांची आई हरवते. म्हांबरी ही म्हातारी स्त्री-आयुष्यात अनेक बरेवाईट सुखदुःखाचे चटके सोसलेले प्रसंग पाहिलेले असल्याने शारीरिक आणि मानसिक उमेद तिच्याकडे असतेच. मास्तर दाम्पत्याला

ती प्रसंगी आधार देते. हद्दपार प्रमाणेच 'गारंबीचा बापू' या कादंबरीतही 'बापू' ही प्रमुख व्यक्तिरेखा असली तरी विविध प्रकृतीची पात्रे यात आलेली आहेत.

अण्णा खोत, दिनकर, विठोबा, यशोदा, मावशी, राधा, रावजी या दुय्यम व्यक्तिरेखा 'गारंबीचा बापू' मध्ये आलेल्या आहेत. अण्णा खोत हा स्त्रीलंपट, मतलबी, गाव प्रमुख - सरपंच असतो. स्वतः गावातील स्त्रियांशी अनैतिक चाळे करतो. संबंध ठेवतो. प्रकरण अंगाशी येताच स्वभावाने गरीब असलेल्या माणसाच्या नावावर ते खपवतो. 'बापू' ची आई यशोदा हिच्याशीही त्याने अनैतिक - विवाहबाह्य संबंध असतात. असे संबंध ठेवता यावेत म्हणून विठोबासारख्या भित्र्या आणि स्वभावाने गरीब असलेल्या माणसावर आपले वर्चस्व प्रस्थापित करतो. यशोदेचा मुलगा बापू हाही विठोबासारखाच असावा या अंदाजाने 'यमीचे प्रकरण' बापूच्या नावावर खपवू पाहातो. परंतु बापू हा वेळीच सावध होतो. सुरुवातीस घाबरतो. मनातल्या मनात आक्रंदतो. पण शेवटी त्याचे विवेकी मन आक्रोश करु लागते. अण्णांच्या विरोधात जाण्याची त्याची भूमिका तयार होत जाते.

'बापू' हा शालेय शिक्षणाच्या बाबतीत कमी शिकलेला असतो. व्यवहारी जीवनात मात्र सूक्ष्म निरीक्षणातून अनेक बारकावे त्याच्या लक्षात येतात. आईने केलेले नखरे त्याच्या नजरेतून सुटत नाहीत. "दोन वेळचं जेवण मिळायची ज्यांची भ्रांत, त्याच्या घरात ती उंची झरकली लुगडी वापरी, जाकिट घाली, लफ्फेदार नथ घाली."[३]

बापूची आई ही मुलाची बाजू न घेता, बापूच्या अब्रूनुकसानीचा विचार न करता अण्णा खोतांची बाजू घेते. अण्णा खोतांबद्दल तो उणेदुणे बोलतो म्हणून बापूलाच ती रागावते. तिच्या अशा वागणुकीने बापूला संताप येतो. आईबद्दल त्याच्या मनात चीड आणि द्वेष निर्माण होतो. यशोदा ही पोटच्या मुलापेक्षा खोताला प्राधान्य देते. मुलाची पाहिजे तशी काळजी ती घेत नाही. स्त्रीसुलभ माया, ममता, वात्सल्य हे गुण तिच्यात आढळत नाहीत. विठोबा ही व्यक्तिरेखा गौण स्वरुपाची आहे. 'बापू' ला ममत्व जे लाभते ते त्याच्या 'विठोबा' च्या भूमिकेतून बापूला तोच लहानाचे मोठे करतो. त्याच्या आजारपणात, दुःखी अवस्थेमध्ये विठोबा रात्रंदिवस त्याच्या उशापायथ्याशी बसतो. मनोभावे त्याची सेवा करतो. कुठे जेवायला गेला असता बापूसाठी गोडधोड वस्तू घरी घेऊन येतो. त्याला रोज चहा करुन देतो. यासारखे बापूचे कोडकौतुक विठोबा करतो.

'बापू' हा प्रकृतीने आणि स्वभावाने आडदांड असतो. हजरजबाबी असतो. कोणी त्याचा अपमान करु लागताच त्याला तो तत्काळ उत्तर देऊन गप्प बसवतो. जसे त्याच्या मुर्डी येथील आक्काने-मावशीने तिच्या मुलांचे जुने कपडे बापूला वापरण्यासाठी दिले असता तो ते कपडे कुणब्यांना देऊन टाकतो.

'तिच्या मुलांचे उंची कपडे पाहून बापू कावराबावरा होई. सदऱ्याला लावलेली ठिगळं शक्य तेवढी चोरुन ठेवण्याचा प्रयत्न करी. बापू घरी निघाला की आक्का आपल्या मुलांचे जुने धडके कपडे त्याला देई. आतल्या आत बापू रागानं लाल होई. म्हणे, "ही मावसाबाई समजते कोण मला? कुणब्याच पोर? आक्काच्या तोंडावर काही बोलत नसे. मुकाटयाने ते सदरे आणी नी कुणब्यांना देऊन टाकी."[४]

असा हा बापू कैर स्वाभिमानी असतो. राधासारख्या स्त्रीवर सामाजिक अन्याय होत असलेला पाहून हळहळतो. तिचा नवरा रावजी मेल्यानंतर बापू तिला एकटी पडू देत नाही. गावातील कोणीही ब्राह्मण त्यांचे लग्न लावणार नाही हे ध्यानात घेऊन सूर्यनारायणाच्या साक्षीने गांधर्वविवाह लावतो. राधापासून त्याला मुलगाही होतो. परंतु गावातील लोकांचा, समाजाचा मुलाहिजा तो बाळगीत नाही. गावात बेडरपणे तो वागत असतो. अफाट संपत्ती कमावतो. वाममार्गाने न जाता श्रीमंत झाल्याने आणि लहानपणापासून गुरवांशी माणुसकीने तो वागत आल्याने गारंबीचा सरपंच 'बापू' नेच व्हावे असे गुरवांना वाटते. पाटाच्या पाण्यावरुन होणारे भांडणही 'बापू' च मिटवितो. त्याची कार्य करण्याची पध्दती आणि निर्णयक्षमता लक्षात घेऊन अण्णा खोत स्वतः बापूला सरपंच होण्यास भरीस पाडतो.

बापूचे त्याच्या भूतवाड्याच्या मावशीवर खूप प्रेम असते. कुठलीही गोष्ट तिला सांगण्यासाठी तो कासावीस होतो. त्याच्या आईबद्दलच्या तक्रारी तर नेहमी याच मावशीकडे सांगत असतो. कमाईला लागल्यानंतरही काही पैसे तो नियमितपणे मावशीला देत असतो. त्याचे चुलते असता मावशीने रागावले तरी त्याला त्याविषयी वाईट वाटत नाही. बापू हा एकनिष्ठ आहे. 'राधा' वर एकटीवरच प्रेम करतो. लग्न या विधीला न अंगिकारताही तिच्याशिवाय इतर स्त्रियांशी अनैतिक संबंध अजिबात ठेवीत नाही.

धर्माच्या 'यम' भागाला बापू मानतो, नियमांना मात्र तो भीक घालीत नाही. धर्माच्या बाह्य कल्पनांना - उपचारांना तो थोतांड समजतो. परंतु अंतरंगाचे - माणुसकीचे - जतन मात्र जीवापाड करतो.

राधा ही स्वच्छ आणि सोज्वळ मनाची असून तारुण्यात पदार्पण करीत असतानाच सामाजिक व्यवस्थेच्या भोवऱ्यात अडकते. त्याची शिक्षा या अर्थाने तिला व्यसनी असलेल्या नवऱ्याबरोबर-रावजीसोबत संसार थाटावा लागतो. इच्छा नसताना ती त्याला सर्वस्व देऊ शकत नाही. तिच्या शरीराची आणि मनाची उपासमार होऊ लागते. बापूची भेट झाल्यानंतर ती त्याच्या प्रेमात पडते. रावजी

मेल्यानंतर बापूला ती आपल्यासोबत राहावयास सुरुवातीला नकार देते कारण, तो ब्राह्मण असून अविवाहित असतो. शरीराचा वासनारुपी भुकेला जर तो बळी पडला तर त्याचे भावी आयुष्य आपल्याप्रमाणे नको असलेल्या जोडीदारासोबत व्यतीत करावे लागेल म्हणून ती त्याला वेळीच सावध करते.

आपल्या देशातील एक जबाबदार सुशिक्षित नागरिक या नात्याने ती फार कर्तव्यदक्ष आहे. सामाजिक चालीरितींची तिला जाण आहे. परिस्थितीचे चटके तिला बसलेले असल्याने ती बापूला सावध करते. तिचेही त्याच्यावर मन गेलेले असते. राधाच्या सांगण्यावरुन तो मावशीला पैसे पाठवू लागतो. तिच्या बाळाच्या प्रत्येक वाढदिवसाला 'गारंबी' या गावात विहीर, शाळा या प्रकारच्या एकेका सामाजिक कार्याची कल्पना ती बापूला सुचविते. गावाला नवीन पध्दतीने एकनिष्ठ जीवन कसे समृध्दीने, समाजाला उपकारक होईल असे जगता येते याचा आदर्श 'राधा' हे पात्र घालून देते.

रावजी हा व्यसनी असलेला 'राधा' चा नवरा. वेळी-अवेळी आठवण येताच 'राधा' बरोबर आपली शारीरिक भूक भागवून घेणारा. क्ष्याने अर्धार्जनासाठी टाकलेल्या हॉटेलच्या कामात त्याचे लक्ष एकदाही केंद्रीत होत नाही. संशयीत स्वभावाचा असल्याने तो राधेच्या चारित्र्याबद्दल शंका घेत असतो. तिला मारहाण करीत नाही. पण मानसिक दडपण मात्र आणीत असतो. तो एक 'माणूस' आहे या भूमिकेतून राधा रावजीच्या आजारपणात रावजीची काळजी घेते. त्याच्या संपूर्ण आयुष्यात आजारात एकही नातेवाईक कादंबरीत भेटीला आलेला दिसत नाही. 'गारंबीचा बापू' या कादंबरीत हे एक गौण पात्र आलेले आहे.

'यशोदा' या व्यक्तिरेखेला वरील कादंबरीत पेंडसे यांना न्याय देता न आल्याने 'यशोदा' या लघु कादंबरीचा जन्म झालेला आहे. 'गारंबीचा बापू' पासून पेंडसे सतत यशोदेसंबंधी असमाधानीच होते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याची पेंडसेंची प्रवृत्तीच खऱ्या अर्थाने याला कारणीभूत होती. शिवाय 'गारंबीचा बापू' ही एका मर्यादित अर्थाने बापूची चरित्रकथा असल्यामुळे यशोदाकडे पेंडशांचे आवश्यक तेवढे लक्ष गेले नव्हते. किंबहुना बापूच्या सावलीखाली इतर पात्रांप्रमाणेच यशोदा -सुध्दा कुठेकुठे नको इतकी धूसर झाली होती आणि म्हणूनच पेंडशांना 'यशोदा' च्या लेखनाची गरज भासू लागली.''[५]

'यशोदा' या कादंबरीतील प्रमुख नायिका 'यशोदा' ही असून आईच्या संस्कारविना वाढलेली अशी ही मुलगी आहे. लहानपणीच आईचे छत्र हरविलेली यशोदा अण्णा खोतांच्या घरी त्यांची मुलगी - ताईसोबत मोठी होते. ताईप्रमाणे यशोदेला प्रेम, माया, आपुलकीचे रागावणे, रुसणे, विशिष्ट संस्काराची शिकवण मिळू शकत नाही. उलट यशोदा जसजशी मोठी होऊ लागतेय तसतशी ताईपेक्षा सुंदर दिसू लागल्याने अण्णा खोतांची पत्नी यशोदेचा द्वेष करु लागते, छळ करु लागते. यशोदेला तिचे काका ती दहा-अकरा वर्षाची झाल्यावर आपल्या घरी घेऊन येतात. तिचे वडीलही ती तीन वर्षाची असतानाच स्वर्गवासी झालेले असतात.

सुंदर असलेल्या, लांब केस असलेल्या यशोदेला वयात येऊ लागताच पुरुषाच्या स्पर्शसुखाची तहान लागते. अजाण असलेल्या यशोदेजवळ फक्त तिचे आंधळे असलेले काका राहत असतात. अण्णा खोत काही ना काही निमित्त काढून त्यांच्याकडे येत असतात. यशोदेच्या खांद्याला, हाताला स्पर्श करीत असतात. तिला त्यामागील अर्थ कळत नाही. तिच्या दोन मोठ्या बहिणी - ताई आणि आक्का योग्य तो सल्ला देत नाहीत. त्यांचेही योग्य ते मार्गदर्शन 'यशोदे' ला न मिळाल्याने ती फसते. अण्णा खोत तिला पूर्णपणे आपल्या जाळ्यात अडकवितात. काका मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी गेले असता 'यशोदा' घरी एकटीच असते. व्याघ्रेश्वराच्या मंदिरात ती गेली असता पांडेबोवा तिला उचलतो. मंदिराच्या मागच्या बाजूला अनैतिक चाळे करतो. हळूहळू ती त्या गोष्टीला चटावते, ललचावते, फसते. पण आपण फसलो आहोत असे तिला वाटत नाही. अण्णा खोत यांनी तिचे लग्न 'विठोबा' सारख्या पाणक्याशी लावून स्वतःचे इप्सित साध्य केलेले असते. पण त्याची जाणीव, त्याविषयीचे ज्ञान तिला नाही. आयुष्याच्या उत्तरार्धात यशोदेला या गोष्टीचे आकलन होते. पण तेव्हा खूप उशीर झालेला असतो. यशोदा ही अनेक गुप्तरोगांनी पछाडलेली असते.

''मी कबूल करते, मला वाईट रोग लागले आहेत. पण याला जबाबदार कोण?... हलकाटांनी जवानी होती माझी तेव्हा मजा मारुन घेतली आणि आता माझी अशी वेळ आली तेव्हा एक एक माणूस ओळख देईल तर शपथ! भस्माचे पै ओढणारा पांडभट.''[६]

अण्णांचा पोकळ स्वाभिमान, लंपट वृत्ती समजण्यास तिला फार उशीर झालेला असतो. 'गारंबी'तच नव्हे, तर त्या त्या प्रादेशिक भू-भागात असे प्रकार सर्रास चालतात. अशा अनैतिक प्रकारांचे भेदक चित्रण करुन पेंडसे वाचकांचे अंतःकरण हेलावून सोडतात. अंतर्मनाला अस्वस्थ करुन विचार करावयास भाग पाडतात.

श्री.ना.पेंडसे यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांकडे कालक्रमानुसार दृष्टिक्षेप टाकता असता व्यक्तिरेखांचे वैविध्य तर जाणवतेच; पण काळ बदलला असता व्यक्तीचे स्वभाव आणि वर्तनही बदलल्याने दृष्टीस पडते. 'रथचक्र' या प्रादेशिक कादंबरी 'ती'च्या मनातील अंतर्मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न पेंडसे यांनी केलेला आहे. ''एका अनामिका नायिकेचा नियतीशी हुतूतूचा खेळ हे रथचक्रचे कथाबीज आहे. त्यात नायिकेच्या मनात संयुक्त कुटुंबातील स्त्री, पत्नी व माता या तीन भूमिकांत ज्या भावनांच्या लाटा उसळतात. तिला जे अनुभव येतात व त्यामुळे अंतर्मनात ज्या प्रतिक्रिया होतात. त्याचे 'रथचक्र'मध्ये आपल्याला दर्शन होते.'' मुलाच्या भवितव्यासाठी,

शिक्षणासाठी ती प्रयत्न करते. नवऱ्याची साथ नसताना तीन मुलांना घेऊन तलुक्याच्या गावी राहाते. परंतु शेवटी नवरा आल्यानंतर त्याच्याबरोबर पुन्हा गावी जाते.

'एक होती आजी'मध्ये आजीवर बंडूने बलात्कार करण्याचा प्रयत्न केलेला असतो. त्यातून ती सहीसलामत सुटते. लग्नानंतर मात्र ती नवऱ्याला वैवाहिक सुख देऊ शकत नाही. बंडू हा स्त्रीलंपट, स्वार्थी आणि मतलबी आहे. तर बल्य आणि हरिराम ही अभ्यासात अत्यंत हुशार अशी पात्रे आहेत. बल्या अंतरजातीय विवाह करुन स्थिरस्थावर होतो. तर हरिरामच्या आयुष्यात मायेची व्यक्ती न आल्याने एखाद्या 'फरारी' प्रमाणे तो जीवन कंठतो. श्रीरामची मुलगी मनी, मुक्ताची मुलगी सुधा या दोघीही अंतरजातीय विवाह करतात. दोघींच्या बाळांचे कौतुक आजी करते. सुधाला मात्र केवळ लैगिंक गरज, कुटुंबाचा आधार आणि सामाजिक व्यवस्थेत स्थैर्य मिळविण्यासाठी एका 'मराठा' पुरुषाला स्वीकारावे लागते. हे तिच्या बाळंतपणात 'आजी'च्या निदर्शनास येते. आजीचा जन्म खेडयात झालेला असल्याने तेथील जीवनाची तिला ओढ आहे. 'रेताडी' बद्दल असलेल्या भ्रामक, अंधश्रध्दाळू कल्पनांवर तिचा विश्वास नाही. त्या जागेवर ती नवीन कलमे लावते, वाढवते. पुरुषत्व प्रधान असलेली, त्याचबरोबर मायाळू, ममताळू, हजरजबाबी असलेली 'आजी' ही स्त्री व्यक्तिरेखा 'सुधा'ला तिच्या सासरच्या कचाटयातून सोडवते.

'तुंबाडचे खोत' ही प्रादेशिक कादंबरी महाकाव्याप्रमाणे प्रदीर्घ असून यात 'खोत' घराण्यातील चार पिढयांची कहाणी आलेली आहे. असंख्य व्यक्तिरेखा यात आलेल्या आहेत. खोत घराण्याची प्रतिष्ठा सांभाळणारे, प्रसंगी इग्रजांशी युक्तिवादाने-अधोरी विद्येच्या माध्यमातून दोन हात करणारे दादा खोत आणि बंडू खोत हे बंधुद्वय होत.जनापाचा मुलगा 'विश्राम' हा लोकमान्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन राजद्रोह करतो. गणेशशास्त्री सारखे पंडीत, 'गोदा' सारखी संयमी, हुशार आणि विवेकी स्त्री, नाना खोतांप्रमाणे सर्वांना सांभाळून घेणारा गोदाचा दीर, ताई, तारा, आप्पा बेडेकर, चिमाजी, भिकाजी, बजापा, जुलाली, ऑल, गंगा, अनंता, बापू, वकील, नरसू खोत, मधू खोत अशा अनेक व्यक्तिरेखा यात आहेत. श्री. ना. पेंडसे यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यातील पात्रे ही ब्राह्मण समाजातील, मध्यवर्गीय असल्याने आढळते.

## प्रदेश आणि व्यक्ती यांचा परस्पर संबंध :-

प्रादेशिक कादंबरीतील प्रदेश आणि व्यक्ती यांचे परस्पर संबंध चिवट, अन्योन्य असतात. त्या प्रदेशाचे, निसर्गाचे गुण त्यांनी आत्मसात केलेले असतात. जिथे त्यांचे बालपण गेलेले असते तेथील मातीचे आणि त्यांचे ऋणानुबंध जोडलेले असतात. म्हणूनच मग ती 'आजी' असो वा गारंबीचा 'बापू' असो; त्यांचे चित्त त्यांच्या प्रदेशातच अधिक रमते. तो प्रदेश सोडून ती बाहेर रमू शकत नाहीत.

## भाषाशैली-

व्यक्तिरेखांच्या संदर्भात विवेचन करावयाचे झाल्यास पात्रानुकूल संवादयोजनेमध्ये श्री.ना. पेंडसे यांचा हातखंडा आहे. त्यांच्या भाषेतून समाजाच्या विचारसरणीचे, राहणीमानाचे दर्शन घडते. सूक्ष्म निरीक्षण आणि चिंतनशीलता हे त्यांचे गुण असल्याचे निवेदनशैलीतून जाणवते. प्रथमपुरुषी आणि तृतीय पुरुषी निवेदनातून पात्रे जिवंत करण्याची पेंडसे यांची हातोटी विलक्षण चतुरअशी आहे.

## पेंडसे यांच्या प्रादेशिकतेच्या मर्यादा –

श्री.ना.पेंडसे यांचे प्रादेशिक विश्व कोकणापुरते मर्यादित आहे. असे असते तरी विविध मनोवृत्तीचे, स्वभावाचे वेगवेगळे नमुने त्यांनी त्यांच्या प्रादेशिक कादंबरीतून अभिव्यक्त केलेले आहेत. "त्यांनी निरनिराळया स्वभावाची, निरनिराळया प्रकाराची विपुल माणस निर्माण केली. ही माणसं सामान्यतः निम्नभध्यम वर्गातली आहेत. या माणसांना पेंडशांनी जिवंत केले आहे.... या माणसांची बौध्दिक क्षमता फार मोठी असते असे नाही. त्यांची चिंतनशक्तीही मर्यादित असते. ती ज्या जगात वावरतात ते जग फारसं व्यापक नसतं.... पेंडशांनी माणसं आपल्या स्वभावधर्माप्रमाणे वागणारी, प्रवृत्तीप्रमाणे कार्य करणारी झाली आहेत. म्हणून ती जिवंत वाटतात."[८]

मध्यमवर्गीय ब्राह्मण समाजातील व्यक्ती पेंडसे यांना अधिक भुरळ घालतात, हे त्यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांतून निदर्शनास येते.

## निष्कर्ष –

प्रस्तुत शोधनिबंधात श्री.ना.पेंडसे या यशस्वी प्रादेशिक कादंबरीकाराच्या प्रादेशिक कादंबरीतील व्यक्तिरेखांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केलला आहे, त्यांच्या प्रादेशिक कादंबरीतील व्यक्तिरेखामध्ये ज्या उणीवा अथवा मर्यादा जाणवल्या त्याही दृष्टीस आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भसूची-**

०१. डॉ. कुलकर्णी मदन, मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरुप, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती- १९८४, पृ. ५३.
०२. तत्रैव, पृ. ५३.
०३. पेंडसे श्री.ना., गारंबीचा बापू, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९५२, पुनर्मुद्रण. १९९७, पृ. ११.
०४. तत्रैव, पृ. १५.
०५. डॉ. शोभणे रवींद्र, कादंबरीकार श्री. ना. पेंडसे, ऋचा प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती - १९९६, पृ. ५३.
०६. पेंडस श्री. ना., 'गारंबीचा बापू' उ. नि. पृ. २२२.
०७. बापट प्र. वा. व गोडबोले ना. वा. मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे तिसरी आवृत्ती - १९७३, पृ. ३१८.
०८. डॉ. बांदिवडेकर चंद्रकान्त, कादंबरीकार श्री. ना. पेंडसे, मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशींग हाऊस पुणे, द्वितीय आवृत्ती - १९९६, पृ. १०७.